# <u>प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.</u>

<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण</u>

**<u>सं. फौ. ख. क.२७८३/२०१४.</u>**
**<u>निशाणी : .</u>**

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याची तारीख | : | १४/११/२०१४. |
| २. फिर्याद दाखल तारीख | : | १४/११/२०१४. |
| ३. फिर्यादीचे नांव | : | श्री. बी. आर चौगुले<br>आर.पी.एफ, सोलापुर. |
| ४. आरोपीचे नांव | : | जगदीश बसप्पा बिराजदार<br>वय २४ वर्षे, रा.डोंबविली |
| ५. गुन्हा कलम | : | कलम १५५ रेल्वे अधिनियम कायदा, १९८९. |

**<u>अपराधाचे विवरण —</u>**

दिनांक १४/११/२०१४ रोजी पहाटे५.०० वाजता तुम्ही गाडी क्रं. १०११५ मधील विकलांग बोगीमध्ये बसुन अनाधिकृतपणे प्रवास करीत असतांना मिळून आलात व त्यानुसार तुम्ही कलम १५५ रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**— <u>आरोपीचे प्रतिकथन</u> —**

प्र. १ : तुम्हांला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय?
उत्तर : होय.

प्र. २ : तुम्हांला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय?
उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हांला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

आरोपीची सही ........................................

**समक्ष**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : १४/११/२०१४.**

## फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १

मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे :

माझे नांव : श्री. अमरजीतसिंह.

वय : ४० वर्षे, व्यवसाय : उप–निरिक्षक, आर.पी.एफ. सोलापुर.

राहण्याचे ठिकाण : सोलापुर.

## सरकारी वकील गैरहजर, सरतपास फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार स्वत:

१. दिनांक १४/११/२०१४ रोजी फिर्यादी श्री. बी. आर चौगुले आर.पी.एफ. सोलापुर यांनी फिर्याद दिली की, त्यांची डयुटी गाडी क्रं १०११५ मध्ये रेडकामी होती. त्यावेळेस आरोपी हा पहाटे५.०० वाजता विकलांग बोगीमधून प्रवास करीत असतांना त्यांना मिळून आला. त्यानंतर फिर्यादीने त्यास पकडून माझेकडे आणले व लेखी फिर्याद दिली. मी फिर्यादीची फिर्याद लिहून घेतली असून त्यावर फिर्यादीची व माझी सही आहे. आता मला ती फिर्याद दाखविली असून ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता निशाणी ३ देण्यात आले. आरोपी हा गाडी क्र. १०११५ मध्ये विकलांग बोगीमधून प्रवास करतांना मिळून आला म्हणून मी आरोपीविरुद्ध कलम १५५ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज रोजी उपस्थित आहे. त्यास मी ओळखतो.

## उलटतपास आरोपीतर्फे तो स्वत: :

२. हे म्हणणे खरे नाही की, गाडी क्र. १०११५ मध्ये मी विकलांग बोगीमधून प्रवास केला हे तुम्ही खोटे सांगत आहात. हे म्हणणे खरे नाही की, तुम्ही माझेवर खोटी केस केली आहे.

३. फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,** **समक्ष,**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**
**दिनांक :१४/११/२०१४.**

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.**

प्रश्न क्र. १ : फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : श्री. अमरजीतसिंह (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक १४/११/२०१४ रोजी पहाटे५.०० वाजता तुम्ही गाडी क्रं. १०११५ चे विकलांग बोगीमधून अनाधिकृतपणे प्रवास करीत असतांना मिळून आलात. याबाबत तुम्हांस काय सांगायचे आहे?
उत्तर : हे खोटे आहे.

प्रश्न क्र. ३ : सदर साक्षीदार तुमचे विरूध्द का साक्ष देतात?
उत्तर : मला माहित नाही.

प्रश्न क्र. ४ : तुम्हांस स्वत:ला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे का ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ५ : तुम्हांस तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा दयावयाचा आहे काय ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ६ : सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय?
उत्तर : नाही.

**समक्ष,**

आरोपीची सही ........................................

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**दिनांक :१४/११/२०१४.** **लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**प्रमाणपत्र**

वरील तपासणी माझेसमक्ष ऐकणेत व घेणेत आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेलेला आहे.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**दिनांक :१४/११/२०१४.** **लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

— **मौखिक न्यायनिर्णय** —
( पारित दिनांक १४ नोव्हेंबर,२०१४. )

१) आरोपीवर कलम १५५ रेल्वे अधिनियम १९८९ अन्वये आरोप ठेवणेत आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे —

दिनांक १४/११/२०१४ रोजी आरोपी हा पहाटे५.०० वाजता गाडी क्रमांक १०११५ चे विकलांग बोगीमध्ये प्रवास करतांना फिर्यादी श्री. बी. आर चौगुले, आर.पी.एफ. सोलापुर यांना मिळून आला.

३) अपराधाचे विवरण (नि.क्र.२) आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणामिमांसहित निष्कर्ष देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १.दिनांक १४/११/२०१४ रोजी पहाटे५.०० वाजता आरोपी हा गाडी क्र. १०११५ चे विकलांग बोगीमध्ये प्रवास करीत असतांना मिळून आल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... होय. |
| २.आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## ***का र ण मि मां सा***

५) **मुद्दा क्रमांक १ :—**

श्री. अमरजीतसिंह (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक १४/११/२०१४ रोजी पहाटे५.०० वाजता गाडी क्र. १०११५ चे विकलांग बोगीमध्ये प्रवास करीत असतांना फिर्यादी श्री. बी. आर चौगुले यांना मिळून आला व त्यांनी फिर्यादीची लेखी फिर्याद निशाणी ३ नोंदवून घेतली. तसेच सदर साक्षीदाराने साक्षीमध्ये पुढे असे सांगितले की, त्यांच्या चौकशीमध्ये आरोपी हा गाडी क्र. १०११५ चे विकलांग बोगीमध्ये प्रवास करीत असतांना मिळून आल्याचे निष्पन्न झाले व तसेच आरोपीजवळ प्रवासाबाबत कोणतेही तिकीट आढळुन आले नाही म्हणून त्यांनी आरोपीविरुद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल केली. सदरची बाब आरोपीने नाकारली आहे. परंतु तो गाडी क्र. १०११५ मध्ये प्रवास करीत होता ही बाब त्याने नाकारलेली नाही. तसेच आरोपीने तो कोणत्या बोगीमध्ये अथवा कोणत्या

बर्थवर प्रवास करीत होता याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. फक्त उलटतपासामध्ये साक्षीदाराची साक्ष नाकारणे यावरुन त्याने विकलांग बोगीमधून प्रवास न केल्याचे गृहीत धरता येणार नाही. तसेच चौकशी अधिका—यास आरोपीस खोटया प्रकरणात गुंतविणेचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. यावरुन चौकशी अधिका—याची साक्ष विश्वास निर्माण करते. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने गाडी क्र. १०११५ चे विकलांग बोगीमध्ये बसून प्रवास केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

६) **मुद्दा कमांक २:—**

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असून हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटुंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिद्व केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्र त्या पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिद्व करीत नाही. गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझ्या मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

आरोपीस, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये, कलम १५५ रेल्वे अधिनियम १९८९ या अपराधाखाली सिद्ध दोषी ठरविण्यात येत असून त्याने सदर अपराधासाठी रुपये २००/— (एकूण दोनशे रुपये फक्त) दंड भरावा. दंड भरणेस कसूर केलेस दहा दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

**कुर्डुवाडी येथील दौरा.**
**दिनांक: १४/११/२०१४.**

**(एम. आर. देशपांडे)**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

-
" I affirm that the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : S.G.Datrange, |
| Court's Name | : M. R. Deshpande, J.M.F.C.Railway Court, Daund. |
| Date | : 15.11.2014 |
| Judgment signed by presiding officer on | : 15.11.2014 |
| Judgment uploaded on | :17.11.2014 |